## जगभर

# ट्रम्प, युरोप आणि निर्वासित

### चन्द्रशेखर पुरन्दरे

प्रथम काही समकालीन प्रक्रिया पाहू.

अति-उजव्या मानल्या जाणाऱ्या वंशवादी, धर्मवादी शक्ती अलिकडेपर्यंत निर्वाचित लोकशाहीत समाजाच्या परिघावर असत. (बाकी राजवटी या विवेचनात अप्रस्तुत आहेत. उदा. चीन, सौदी अरेबिया, इजिप्त, वगैरे अनेक. ते राज्यकर्ते प्रजेला उत्तरदायी नसतात.) त्या राजकारणात उतरल्याच तरी त्यांचा मतांचा हिस्सा दुर्लक्षणीय असे. नंतर त्या उजव्या पक्षांना बळकटी देऊ लागल्या किंवा उजवे पक्ष त्यांच्या आदर्शवादाकडे झुकू लागले. तरी उजवे पक्ष स्वबळावर निवडणूक जिंकू शकत नसत आणि लोकशाहीच्या न्याय्यतेवर विश्वास असणारे ती लोकांच्या सूज्ञतेची प्रचिती मानत! मात्र आजवर विरोधात असणारे उजवे पक्ष आज मुख्य प्रवाहाला संमत होतात व सत्तास्थानी येतात असे दिसत आहे. ही प्रक्रिया जगभर चालू दिसते व वेगही घेत आहे.

ही राजकीय प्रक्रिया म्हणू.

सामाजिक पातळीवर दुसऱ्या एका प्रक्रियेने आज जगात वेग घेतलेला आहे. आजच्या काळातील जगातील मानवी वेदनेच्या प्रतवारीत निर्वासित नोंद अग्रक्रमावर आहे.

सामाजिक संदर्भ पश्चिमेपुरता मर्यादित ठेवता आणखी एक प्रक्रिया लक्षणीय आहे. जगातील गौरवर्णीय संख्येने कमी होत आहेत. आजवर उर्वरित जगावर भौगोलिक आणि/किंवा आर्थिक साम्राज्य असणारे देश आज तेवढे समर्थ नाहीत. त्यामुळे त्यांची सामान्य जनता अस्वस्थ आहे.

आर्थिक-भौगोलिक पातळीवर जागतिकीकरण ही तिसरी प्रक्रिया. जागतिकीकरणाचा अविभाज्य भाग, किंबहुना ध्येय म्हणजे पैसा व श्रमशक्ती यांचा अनिर्बंध संचार, जागतिकीकरणाला राष्ट्र-राज्य या भौगोलिक सीमा मान्य नाहीत. जोपर्यंत भांडवलाचा मुक्त संचार सीमापार होत असे आणि तो विकसित देशांना फायदेशीर होता, तोपर्यंत त्यांना यात काही आक्षेपार्ह नव्हते. मात्र, त्याबरोबर आणि पुढे दिलेल्या स्थानिक कारणांनी श्रमशक्तीचा व निराधारांचा प्रवेश जेव्हा आपल्या देशात होऊ लागला, तेव्हा निषेधाचा सूर अति-उजव्या गटांनी लावायला सुरुवात केली. यात व्यस्तता आहे. जागतिकीकरणाने देशांतर्गत विस्थापित निर्माण होतात तितक्या निश्चितपणे देश सोडायला लागणारे निर्वासित निर्माण होतातच असे म्हणता येत नाही. ते धार्मिक आतंकवादी हिंसाचाराने होतात, दुष्काळाने होतात, बेरोजगारीने होतात, वगैरे.

अलिकडच्या काही वर्षांत आफ्रिका आणि मध्य-पूर्वेतून निर्वासितांचे लोंढे युरोपला थडकत आहेत. त्याबाबतचे सरकारी धोरण प्रत्येक देशात निराळे असते. प्रामुख्याने निर्वासित ग्रीस, इटली व तुर्कस्तानमध्ये येतात. निर्वासित बहुश: मुस्लीम. तुर्कस्तान मुस्लीम देश तर उरलेला युरोप बहुश: ख्रिश्चन व बहुश: विकसित. निर्वासितांचे अंतिम उद्दिष्ट विकसित पश्चिम युरोप असते, तुर्कस्तान किंवा इटली किंवा ग्रीस नव्हे. या स्थलांतरणाचा वेळोवेळी आढावा घेतलेला आहे. (विशेषत: मागच्या वर्षीच्या जानेवारी-फेब्रुवारीच्या 'आंदोलन' विशेषांकात.) निर्वासितांमुळे युरोपातील प्रत्येक देशांतील सामाजिक वातावरण ढवळून निघत आहे. त्या देशांच्या समाजांचा आजवरचा बहुतांशी एकजिनसीपणा धोक्यात आल्याची भावना आहे.

या पार्श्वभूमीवर ट्रम्प या अमेरिकन अध्यक्षाने जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात संपूर्ण आफ्रिका खंड हे गटार आहे असे उद्गार काढले. त्या लोकांना थारा द्यायला आम्ही (अमेरिका) बांधील नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

या उद्गारांवर जगभर अपेक्षित निषेध झाले. व्हेटीकन या सर्वोच्च ख्रिश्चन धार्मिक स्थानापासून बोटस्वाना या आफ्रिकन देशापर्यंत.

'आम्ही' आणि 'ते' ही सनातन मानवी द्विभाजक वृत्ती आणि वरील राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रक्रिया यांचा हा दुर्दैवी संगम दिसतो. ट्रम्प म्हणतो म्हणजे ते बेतालच असणार ही प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया होते. तीमुळे अमेरिकेचे जगातील स्थान व निर्वासितांचा संदर्भ याकडे दुर्लक्ष होते.

न्यूयॉर्क टाइम्सनुसार स्थलांतरण व निर्वासित ही विकसित देशांबाबत वस्तुस्थिती झाली आहे. त्यांच्या समाजांतील वाढती आर्थिक विषमता, न वाढणारे पगार यामुळे सामान्य जनता अस्वस्थ आहे. ही अस्वस्थता निर्वासितांना जबाबदार धरते. (मुंबईची दुरवस्था का, तर बिहारी, पुण्याचे शांत जीवन का बिघडले तर परप्रांतीय विद्यार्थी आणि आय-टी नोकरदार!) त्यात पश्चिमेतील वयोवृद्धांचे प्रमाण वाढत आहे. त्याचा तणावही पश्चिमेत आहे. तसेच पाश्चात्त्य माणसांच्या मते आपल्या देशात आश्रय मिळाला याबद्दल या आगंतुकांना कृतज्ञता नसते. यांच्याबरोबर आतंकवादी आपल्या समाजात शिरकाव करतील ही प्रसंगी साधार भीतीही

असते.

मध्य-पूर्व आणि आफ्रिका येथून होणारे स्थलांतरण युरोपने नीट हाताळले नाही. त्यामुळे निर्वासितांच्या वेदनेत भर पडली. अनेकांना गुलामगिरी, वेठबिगारी करावी लागत आहे. एकूण निर्वासितांचा प्रश्न आपल्या सरकारच्या नियंत्रणाबाहेर गेला आहे हे लोकमत तयार झाले आणि सरकारबद्दल व पर्यायाने निर्वासितांबद्दल संशय वाढला. परिणामत: सरकारी धोरणही निर्वासितांना आश्रय देणे, त्यांच्या मानवी गरजा भागवणे यापेक्षा येणारा ओघ थांबवता आला नाही तरी शक्य तेवढा मर्यादित करावा असे होत आहे.

म्हणजे, ट्रम्प जे आज म्हणत आहे, ती भूमिका आजवर अति-उजव्या गटांची होती. तेव्हाची पश्चिम युरोपियन समाजाच्या परिघावरची ती भूमिका आता मुख्य प्रवाही होत आहे, असे न्यूयॉर्क टाइम्सचे प्रतिपादन आहे. ही चिंताजनक बाब आहे. जर्मनीच्या आंगेला मेर्केलने २०१५ ला १० लाखापर्यंत निर्वासित घेण्याचे धोरण जाहीर केले. त्याला तेव्हा जर्मन जनतेचा पाठिंबा होता. पण तेव्हाही ही भूमिका मध्य आणि पूर्व युरोपमधील काही राष्ट्र-प्रमुखांना मान्य नव्हती. उदा. तेव्हापासून अगदी परवापर्यंत काही राष्ट्र/पक्ष-प्रमुखांची वक्तव्ये पुढीलप्रमाणे -

चेक रिपब्लिकचे अध्यक्ष - 'मुस्लीम स्थलांतरित गुन्हेगार असतात'.

पोलंडच्या सत्तारूढ पक्षाचे अध्यक्ष - 'मुस्लीम स्थलांतरित संसर्गजन्य रोग आणतात.'

हंगेरीचे अध्यक्ष -'ख्रिश्चन नसलेले स्थलांतरित, विशेषत: मुस्लीम हे जहर आहे. ते नकोत. मुस्लीम निर्वासित हा मध्य-पूर्व आणि जर्मनीचा प्रश्न आहे, तो त्यांनी सोडवावा. हंगेरीच्या विकासासाठी एकाही मुस्लीम निर्वासिताची जरुरी नाही. आमचे आम्ही समर्थ आहोत.' हंगेरीने सीमेवर निर्वासितांना आपल्या देशाबाहेर ठेवण्यासाठी भिंतही बांधली.

आणि परवा परवा ऑस्ट्रियाचे गृहमंत्री - 'स्थलांतरितांना निराळ्या छावण्यात ठेवा.' या विधानाने दुसऱ्या महायुद्धातील ज्यूंच्या छावण्यांची आठवण होते.

म्हणजे ट्रम्पचे विधान सुटे, एकले नाही. त्यामागे 'आम्ही गोरे श्रेष्ठ वंशाचे' हा दर्प आहे.

युरोपमधील काही नेत्यांच्या अशा भूमिकेमुळे संपूर्ण युरोपचे निर्वासितांबाबत एक धोरण नाही. याचे बळी निर्वासित होतात. ते ज्या देशांमध्ये आले, विशेषत: तुर्कस्तान व ग्रीस, तेथेच निम्न-मानवी स्तराच्या छावण्यात अडकून पडतात.

इटलीने लीबियातून येणाऱ्या निर्वासितांना रोखण्यासाठी निराळा प्रयोग करून पाहिला. बऱ्याच आफ्रिकन देशांतून पुढे युरोपला जाण्यासाठी निर्वासित लिबियाला येतात, तेथे मानवी व्यापारावर लष्करी गटांचे नियंत्रण असते. असे अनेक गट (टोळ्याच खरेतर) आहेत, कारण लिबियात अराजक आहे. या लोकांना लिबियाचा किनारा सोडता येऊ नये म्हणून इटलीने या लष्करशहांशी संपर्क साधला. इटलीच्या अधिकृत सांगण्याप्रमाणे त्यांनी वाटाघाटी करून निर्वासितांना लिबियातच अडकवले. या क्षेत्रातील इतर संस्थांच्या मते लष्करशहांशी फक्त वाटाघाटी करून त्यांचे मनोपरिवर्तन झाले असेल हे अशक्य आहे. इटलीने करोडो डॉलर्स ओतून ही ग्वाही मिळवली असणार. कर्नल गडाफी जेव्हा (२०११ पर्यंत) लिबियाचा हुकूमशहा होता तेव्हा तोही अशी करोडो डॉलर्सची खंडणी अशा स्थलांतरावर आळा घालण्यासाठी युरोपातील देशांकडून वसूल करत असे. त्या पार्श्वभूमीवर इटलीचा हा दावा संशयास्पद वाटतो.

हा ओघ वाटाघाटी होऊन थांबला असेलही पण तरी खरा मुद्दा निर्वासितांचा आहे. ते लिबियात अडकले आहेत. मूळ देश कोणत्यातरी मजबुरीने सोडलेला. परतीचा मार्ग नाही. त्यामुळे त्यांचा आपल्याकडे येणारा ओघ इटलीने थांबवला पण लिबियात त्यांच्या हालअपेष्टा चालू राहिल्या आहेत.

या प्रश्नाला उपरिनिर्दिष्ट वंशवाद, धार्मिक अहंकार, जागतिकीकरण इत्यादी पैलू आहेतच पण निराळा एक पैलूही आहे. देशाच्या सीमा किती 'पवित्र', अनुल्लंघनीय असतात हा तो मुद्दा. जर त्या देशाला आवश्यक असे कौशल्य नसेल तर कोणताही देश परकीयांचे स्वागत करत नाही. देश आहेत, त्यांच्या आखीव सीमा आहेत ही वस्तुस्थिती. ती श्रेयस्कर, नैतिक आहे का, असावी का हा तात्त्विक मुद्दा. मग व्यावहारिक पातळीवर सीमासुरक्षा येते. ट्रम्पच्या वक्तव्याचा दुर्दैवी परिणाम म्हणजे, जो कोणी देशाच्या सीमा राखू इच्छितो, तो वंशवादी आहे असे समीकरण तयार होत आहे. वस्तुत: तसे असण्याचे कारण नाही. तुम्ही निर्वासितांचा ओघ नियोजन करून नियंत्रित करू शकता आणि प्रत्येक देश मानवी अनुभूतीने त्यांना आश्रयही देऊ शकतो. (साधे गणित मांडायचे तर युरोपच्या दारावरचे, आत आलेले निर्वासित २०-२५ लाख धरू. एकूण युरोपची लोकसंख्या ७५ कोटी. म्हणजे दर ३०० युरोपियनांमागे एक निर्वासित पुनर्वसित होऊ शकतो.) असेच गणित अमेरिकेबाबत मांडता येईल पण ट्रम्पच्या कारकीर्दीतील अमेरिकेकडून ही अपेक्षा नाही. युरोपमध्ये तरी मागील एका लेखात म्हटल्याप्रमाणे ज्या पूर्व युरोपिअन देशांनी हिटलर, स्टालिन व नंतर कम्युनिस्ट दडपशाहीचा अनुभव घेतलेला आहे त्या चेक रिपब्लिक, हंगेरी, पोलंड या देशांनी स्थलांतरितांना जराही सहानुभूती न दाखवणे विस्मयकारक आहे. राहता राहिला विकसित लोकशाही पश्चिम युरोप. तेथील देश - ब्रिटन, फ्रान्स, वगैरे उठसूठ मानवी हक्कांचा गजर करत असतात. त्यांनीही

*(पान २३ वर)*

***जगभर,*** *(पान ११ वरून)*
अधिकृत नाही पण अनधिकृतरीत्या ट्रम्पचे धोरण स्वीकारावे यावरून तद्देशीय लोकांची अक्षम्य उदासीनता उघड होते. एका निरीक्षकाच्या शब्दात 'जर्मन आणि ऑस्ट्रियन खेड्यांमध्ये ट्रम्प काय म्हणतो याला त्या त्या देशाचे प्रमुख काय म्हणतात याहून जास्त विश्वासार्हता आहे.' त्यामुळे त्या देशांनी अधिकृत बोलताना वरील विधानावरून ट्रम्पचा कितीही निषेध केला (आणि तोही युरोपमधून कमीत कमी झाला!) तरी प्रत्यक्षात कृती करायला ट्रम्पचे धोरण हा वस्तुपाठ आहे.

जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे कोण आपुले - हे अनुत्तरित आहे.

*(विस्तारभयास्तव तुर्कस्तान-युरोप यांच्यातील याबाबतीतील कराराची नोंद घेतलेली नाही.)*

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*